# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. १५/०६/२००७

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक १५/०६/२००७ रोजी सभा सुचना क्र. ०८ दि. ११/०६/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ५) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ६) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ७) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ८) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| ९) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| १०) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ११) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| १२) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| १३) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| १४) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १५) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

### गैरहजर सदस्य

१) श्रीम. गिता भरत जैन सदस्या

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग यांचे मी हार्दिक स्वागत करतो आणि सभेला सुरुवात करावी अशी मी सचिवांना सुचना करतो.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. १५/०६/२००७ रोजी दुपारी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, दुसरा मजला समिती सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०८, दि. ११/०६/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ६१, दि. २८/०२/२००७, दि. ०८/०३/२००७ दि. १५/०३/२००७ दि. ०७/०४/२००७ दि. १३/०४/२००७ व दि. ११/०५/२००७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विषय मंजुर आहे.

**मा. सभापती :-**

विषय मंजुर आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. आपण मा. महासभेमध्ये पदोन्नती बाबत असे संबोधले होते की, १६ तारखे पर्यंत त्यांना ऑर्डर देणार. तर त्याची कारवाई काय झाली? कारण उद्या १६ तारीख आहे. तर मा. महासभेमध्ये पदोन्नती बाबतचा विषय होता. तर मी त्याच्यावर चर्चा केली होती आणि आपण बोलले होते आश्वासन दिले होते की, १७ तारखेपर्यंत त्यांचे आदेश त्यांना प्राप्त होतील.

------------ :-

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, १२ वर्षाची जी वेतनश्रेणी लागायची होती ज्या कर्मचाऱ्यांना जिथून १२ वर्ष झाली. त्यांना लागू केल्याचा आदेश इश्यु केलेला आहे. मा. महासभेमध्ये साहेबांनी तसे सांगितले आहे. खतगावकर साहेब होते. ------------- पर्यंत गेले. ---------- कारवाई होईल.

**मा. आयुक्त :-**

आपण मा. महासभेमध्ये जे आश्वासन देतो. त्याची पुर्तता करतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, १७० कामगारांची भरती कारायची होती. तर त्याचे काय झाले?

**मा. आयुक्त :-**

आता, इलेक्शनच्या गडबडीत आहोत. इलेक्शन झाल्यानंतर घेणार.

(सन्मा. सदस्य एस. ए. खान यांनी प्रकरण क्र. ६१ च्या ठरावाचे वाचन केले.)

**परशुराम म्हात्रे :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपण ७० कामगारांचे १७० कामगार केले. त्यच्यामध्ये स्टॅन्डीग कमिटीचा मोठा वाटा होता. त्याची मोठी मागणी होती. तेव्हा त्यांनी १७० केले. तर, स्टॅन्डीग कमिटीचे काही विचारात घेतले नाही.

**मा. आयुक्त :-**

त्या प्रोसेसला खुप वेग लावणार.

**प्रकरण क्र. ६१ :-**

दि. २८/०२/२००७, दि. ०८/०३/२००७ दि. १५/०३/२००७ दि. ०७/०४/२००७ दि. १३/०४/२००७ व दि. ११/०५/२००७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र.** :-

दि. २८/०२/२००७, दि. ०८/०३/२००७ दि. १५/०३/२००७ दि. ०७/०४/२००७ दि. १३/०४/२००७ व दि. ११/०५/२००७ रोजींच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. एस. ए. खान** **अनुमोदन :- श्री. परशुराम म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. ६२ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. ६२ च्या ठरावाचे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. ६२ :-**

महानगरपालिकेत सुरक्षा रक्षक नेमणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र.** ५६ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध महत्वाच्या वास्तुचे व मालमत्तेच्या, पाण्याच्या टाक्या यांचे संरक्षणार्थ मिरारोड पोलीस स्टेशन यांचे यापूर्वी अतिरेक्यांच्या घातक कारवाई पासून सुरक्षीतता बाळगावी यादृष्टीने तात्कालीन नगरपालिकेपासून वेळोवेळी जाहिर वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन इच्छूक सुरक्षा रक्षक पुरवठादारकाकडून निविदा मागविण्यात येवून त्याप्रमाणे किमान दराने सुरक्षा रक्षक पुरवठा करण्यास तयार असलेल्या ठेकेदारास काम करण्यास देण्यात आलेले आहे. त्यानुसार सन २००६-०७ या वर्षात सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याचा ठेका मे. सैनिक इंटेलिजन्स सिक्युरिटी प्रा.लि. यांना देण्यात आलेला होता. त्यांची मुदत दि. ३०/०६/२००७ रोजी संपत आहे. मुदत संपत असल्यामुळे नविन सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याबाबत ठेकेदाराकडून निविदा मागविणे आवश्यक आहे. परंतु, निविदा मागविणेस अल्प कालावधी राहिलेला असून निविदा मागवून त्याची पुढील प्रशासकिय कार्यवाही पूर्ण करावयाचे दरम्यान महापालिका सार्वत्रिक निवडणूक २००७ ची आचार संहिता लागु होण्याची शक्यता आहे. त्यामुळे दरम्यानच्या कालावधीत सध्या सुरक्षा रक्षक

पुरवठादार ठेकेदारास मे. सैनिक इंटेलिजन्स सिक्युरिटी प्रा.लि. यांना सहा महिने मुतदवाढ देण्यास ही सभा मंजुरी देत असून येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. शशिकांत भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. ६३ चे वाचन केले.)

**हंसुकुमार पांडे :-**

मिरा भाईंदर मे बाहरसे ऑपरेशन करने के लिए जो डॉक्टर आते है। और वह लोग जो इन्स्ट्रुमेन्ट लाते है तो उनपर ऑक्ट्रॉय वसूल किया जाता है तो मै ऐसा चाहता हु की, उनके उपर ऑक्ट्रॉय न लागाते हुए और उनके जो इन्स्ट्रुमेन्ट है वह ऑक्ट्रॉय के लिस्ट मे समावेश किया जाए। और ऑक्ट्रॉय का ॲक्जमिशन दिया जाए।

**मा. सभापती :-**

पेशन्टसे लेते है क्या वह पहले देखो।

**रोहिदास पाटील :-**

साहेब, तुम्ही त्याला ठेका देतेवेळी त्याला कोणत्या अटी घातलेल्या आहेत? त्या पहिल्या बघा.

**गिता जैन :-**

मिरा भाईंदर शहरासाठी प्रायव्हेट डॉक्टर मागवतात.

**रमेश जैन :-**

मॅडम, ऐसा नही है।

**हंसुकुमार पांडे :-**

यह विषय पास करना ही है। जो आयटम है तो उसमे समावेश करके लिया जाए।

**रमेश जैन :-**

कोई भी इन्स्ट्रुमेन्ट ऑपरेशन करने के लिए लेके आएगा तो उसका ऑक्ट्रॉय लेते है।

**हंसुकुमार पांडे :-**

अगर उसका ऑक्ट्रॉय लेंगे तो उनको रेट बढाना पडेगा।

**रमेश जेन :-**

नया इन्स्ट्रुमेन्ट नही है।

**हंसुकुमार पांडे :-**

जुना इन्स्ट्रुमेन्ट है। उनका रोजका इन्स्ट्रुमेन्ट है। मा. आयुक्त साहब, उनका हमेशा का इन्स्ट्रुमेन्ट है। जो अंदर आता है। तो सिर्फ उसमे समावेश किया जाए।

**रमेश जैन :-**

मतलब नया इन्स्ट्रुमेन्ट नही है। अगर ऑपरेशन करने को मै भाईंदर आया तो उस इन्स्ट्रुमेन्ट का ऑक्ट्रॉय लेते है। दो-दो घंटा उनका वेस्टेज होता है।

**ज्युडी डिसोझा :-**

डॉ. साहब, पेशन्ट को कन्सीशन लेते है। की आपण पेशन्टसे पुरा पुरा पैसा लेते है। गरिब हो या अमिर हो फिर भी आप पुरा पुरा पैसा लेते है।

**रमेश जैन :-**

इन्स्ट्रुमेन्ट बादमे लेकर आयेगा तो वह इन्स्ट्रुमेन्ट कैसा करेगा।

**एस. ए. खान :-**

वह लेके वापस जाते है ना।

**ज्युडी डिसोझा :-**

अगर उनको कन्सीशन मिलेगा तो पेशन्ट को भी कन्सीशन दो ना।

**रमेश जैन :-**

तो वह इन्स्ट्रुमेन्ट नया लेके थोडी आ रहा है।

**एस. ए. खान :-**

युझ किया हुआ लेके आ रहा है।

**रमेश जैन :-**

वह इन्स्ट्रुमेन्ट नया लेके नही आते है। जुना लाते है।

**ज्युडी डिसोझा :-**

जुना ही लाते है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य खान साहब, अउपका कहना अलग है। और डॉ. साहब का कहना अलग है।

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. माझी थोडीशी सुचना आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास आराखड्यामध्ये जी आरक्षणे अआहेत. ते विकसित करण्याचे काम चालु आहे. बी.ओ.टी. तत्वावर आपण बरीचशी आरक्षण विकसित करण्यासाठी देत आहोत. बी.ओ.टी. तत्वावर दिल्यानंतर निश्चितच महापालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढणार आहे. आणि त्या संदर्भात मागच्या सभेमध्ये अशी चर्चा झाली की, जकातीच्या संदर्भात बी.ओ.टी. चे प्रकल्प येतील. त्यांना जकातीमध्ये माफी मिळावी असे अटीशर्तीमध्ये टाकणार आहोत. त्या अटीशर्ती आपण टाकणार आहोत आणि त्या अटीशर्ती टाकल्या अशी स्थायी समितीच्या सभेची मागणी आहे. त्या अटीशर्ती टाकलेल्या आहेत की नाही? आणि नसेल तर त्या त्वीत टाकून घ्या.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. साहेब खुलासा करावा.

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये सन्मा. स्थायी समितीमध्ये मागच्या वेळेला चर्चा झालेली होती. परंतु, त्या संदर्भात मी अधिका-यांची बैठक बोलावलेली होती. आणि त्या अधिका-यांच्या बैठकीमध्ये अशी चर्चा झाली की, बी.ओ.टी. तत्वावर जरी दिलेली असेल तर बी.ओ.टी. पध्दतीने जो विकास करणार आहे त्या विकासापोटी संबंधितांना काहीतरी बेनिफिट मिळणार आहे. म्हणजे बेनिफिट न घेता एखादी गोष्ट करायला हरकत नाही. म्हणून आपण त्याबाबतीमध्ये असा विचार केला की, जरी स्थायी समितीने ठरवलेले असले तरी बी.ओ.टी. तत्वावर जे-जे प्रोजेक्ट महानगरपालिका हाती घेणार आहे. उदा. द्यायचे झाले तर शिवार गार्डनच्या बाबतीमध्ये एक उदाहरण मी आपल्याला देतो की, शिवार गार्डन टाउन पार्क विकसित करायचे आहे. त्यासाठी आपल्याकडे ज्या निविदा प्राप्त झाल्या तर ४५ हजार रुपये आपल्याला वार्षिक देणार आहे. परंतु, त्याच्यामध्ये जे काही डेव्हलपमेन्ट करणार आहे. ते जवळजवळ १० ते १२ कोटी रुपये इन्व्हेस्टमेन्ट करणार आहे. १० ते १२ कोटीची इन्व्हेस्टमेन्ट केल्यानंतर त्यांचे इन्कम चालू होणार आहे. ते आपल्याला फ्री करुन देतात अशातला भाग नाही. आणि त्याच्यावर जे पैसे कमवत असतील किंवा त्यांना जर रक्कम मिळत असेल तर मग, आपण महापालिकेचे नुकसान म्हणजे असे की, आपण बी.ओ.टी महापालिकेचे नुकसान म्हणजे असे की, आपण बी.ओ.टी. वाल्यांना जर सोयी सुविधा प्राप्त करुन दिल्या. रेल्वेवाले तर पैसे कमवणारच आहे. परंतु, आपण ठेकेदाराला जकात घेणार आहोत किंवा आपण ठेकेदाराला जकात घेणार आहोत किंवा त्यात इन्व्हेस्टमेन्ट करणार आहोत.

**जयंत पाटील :-**

साहेब, हा जो आपला विषय आला. तो घनकचरा निर्मुलन प्रकल्पामुळे हा विषय निर्माण झाला. आपण त्यावेळेला काय सांगितले की, महापालिकेने किती तरी लाख रु. द्यायचे तर महापालिकेने न देता म्हणजे जसे सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) यांनी सांगितले की, ज्यांना तो प्रोजेक्ट घेतलेला आहे. त्यांनीच तो ऑक्ट्रॉय भरावा. असे करा महापालिकेने भुर्दंड भरु नये. आमचे हे मत आहे.

**मा. आयुक्त :-**

माझा सांगण्याचा उद्देश तोच आहे. जो कोणी ठेकेदार असेल. त्या ठेकेदारांनी जकात भरायचे महापालिकेचा त्याच्याशी काही संबंध नाही. महापालिकेने रिम्बेरर्समेंट जकात ठेकेदाराला द्यायची गरज नाही. त्यांनी स्वतःच भरायचे.

**जयंत पाटील :-**

त्यासाठी आमची काही हरकत नाही. त्यांच्या अटीशर्तीमध्ये ती अट तुम्ही टाका.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपण आज जकातीचा ठेका दिल्यानंतर गेल्या वर्षी महापालिकेच्या कामकाजातून मा. आयुक्त साहेब, मा. सभापती साहेब, स्थायी समितीचे सदस्य, उपायुक्त, जकातीच्या संबंधित किंवा आपले अधिकारी या सगळ्यांना त्याच्यासाठी वेळ द्यायला लागणार आहे. अनेक नागरिकांच्या वेगवेगळ्या तक्रारी येतात. वेगवेगळ्या पद्धतीने तुमच्या स्वभावाने तुम्ही समजावले. आमच्या स्वभावाने आम्ही समजावले आणि वर्षभर आपण सांगतो. त्यांना कोणत्या अटीशर्ती घातल्या. आणि कामकाजाला वेळ कामी होईल. नाहीतर जेव्हा बघाव तेव्हा मोर्चा मा. आयुक्त साहेबांकडे येतो. मा. उपायुक्त साहेबांकडे येतो. आपण नगरसेवक म्हणून आपल्याकडे मोर्चा येतो. जकात नाक्यावरची --- असे आपण ज्या अटीशर्ती देतो व नमुना तयार केला तर नमुना काय तयार केला? जेणेकरुन तुम्हाला त्रास कमी होईल आम्हाला त्रास कमी होईल. नागरिकांना त्रास कमी होईल. यासाठी अटीशर्ती टाकणे गरजेचे आहे. मार्बल वाल्याचा विषय वेगळा होता. --- त्यांचा विषय

वेगळा होता. आपल्या अटीशर्तीमध्ये जे टाकता येतील. ते टाका. त्यांना ही त्रास नाही. आम्हाला ही त्रास नाही.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) तुमचे म्हणणे बरोबर आहे. दंडात्मक कारवाई आहे. त्याच्यामध्ये तो ऑक्ट्रॉयवाला गडबड करतो. ते फॅक्ट आहे. लपून राहिलेले नाही. दंडात्मक कारवाई आपली आहे. लोकांनी ऑक्ट्रॉय चुकल्यानंतर त्यांना माफ करा. असे मी म्हणत नाही. पण ती कारवाई महापालिकेच्या माध्यमातून झाली पाहिजे. महापालिकेचे उत्पन्न वाढेल. आणि त्याच्यासाठी त्यांचे जे तिकडे ब्रॉन्च आहे. ते तुम्हाला संपूर्ण बंद करायला लागेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हाच विषय मागच्यावेळेला स्टॅण्डींग मध्ये घेतलेला होता की, जकात भरणारी पद्धत आपण नेमली. तर ह्याचा फायदा निश्चित महापालिकेला होईल.

**जयंत पाटील :-**

ते महापालिकेच्या माध्यमातूनच करावे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांना आपण डीस्ट्रीब्युट करतच नाही. आपण आपल्या पद्धतीने सिल्व्हर पार्कच्या नाक्यावर ठेवले. तरी ह्याचा भरपूर फायदा होईल.

(सन्मा. सदस्य एस. ए. खान यांनी प्रकरण क्र. ६३ च्या ठरावाचे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**जयंत पाटील :-**

आर फॉर्म भरु शकतात ना.

**रोहिदास पाटील :-**

ते आपण बायलॉट करतो.

**जयंत पाटील :-**

त्याला लागत नाही. आर फॉर्म लागतो.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब खुलासा करतात.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. या ठिकाणी मुंबईवरुन येणारे डॉक्टर ऑपरेशनसाटी स्वतःचे साहित्य आणतात. आणि ते साहित्य परत घेवून जातात. तर, त्याच्यावर ऑक्ट्रॉय घेतात. आणि ते ऑक्ट्रॉय घेवू नये अशाप्रकारे इंडीयन मेडीकल असोसिएशन ने आपल्याला पत्र दिलेले आहे. आणि त्या पत्राप्रमाणे आपण त्यांना तशाप्रकारे इंन्स्ट्रक्शन देवू. पण त्यांनी तशाप्रकारच्या नोंदणी त्या ठिकाणी करणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :-**

नोंदणी करायलाच लागते.

**मा. आयुक्त :-**

त्यांचे जे जे इंन्स्ट्रूमेंट असतील. त्यांनी ते इंन्स्ट्रुमेंट जाताना पून्हा दाखवायचे.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, आपल्याला निर्धस जेव्हा निविदा फोडायच्या होत्या. त्या टाईमचा स्थगिती आदेश आले का? नगरविकास विभागाकडून अशी हरकत कोणी घेतलेली? कारण, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी मोठा तांडव मा. महासभेमध्ये घातलेला. असा कोण होता? आपल्या स्थायी समितीची चुकी काय झालेली किंवा चुकीचा निर्णय स्थायी समितीने घेतलेला म्हणून ते स्थगिती आदेश देण्यात आले. कोणाला स्थगिती आदेश होता? कशाबद्दल होता? तर त्या स्थगिती आदेशाचे वाचन करा. आम्हाला पण कळायला पाहिजे कारण, त्या गडबडीमध्ये आम्हाला ऐकायला आलेले नाही. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेसाहेब असे बोललेले की निविदा मंजूरी तुम्ही अशा केल्या. निविदा मंजूरीला पण दिलेल्या नव्हत्या. निविदा मंजूरीला आज येते. मग, त्यांनी सांगितले की, निविदा मंजूरी झाल्या तेव्हा त्यांनी मोठे तांडव केले. त्यामुळे त्या पत्राचे वाचन केले तर बरं होईल.

**मा. सभापती :-**

ते स्टॅण्डींगचे सदस्य नव्हते का? त्यांनी स्टॅण्डींगचे काहीच माहित नाही का?

**शशिकांत भोईर :-**

कारण त्यांना प्रत्येक वेळी ऑब्जेक्शन घ्यायची चिक्कार हौस आहे ना.

**जयंत पाटील :-**

त्या सभेमध्ये मी बोललो की, स्थायी समितीमध्ये कुठलाही चुकीचा निर्णय घेतला नाही. कुठला निर्णय घेतला ते सांगा. तेव्हा ते गप्प बसले.

मा. आयुक्त :-

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे. त्या संदर्भामध्ये मी खुलासा करतो की, मिरा भाईंदर महानगरपालिका जकात प्रक्रिया जी सुरु झालेली होती. त्या पत्राचा नंबर आहे ११०७/८४८ प्र.क्र./१९७/नवि/-२८ दि. ३१/०५/२००७ ते पत्र मी आपल्याला वाचून दाखवतो.

(मा. आयुक्तांनी पत्राचे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

ज्यावेळेला स्थगित आदेश आलेला तेव्हा तक्रार कोणी केलेली असेल?

**मा. आयुक्त :-**

त्याच्यात काही नमुदच केलेले नाही.

**मा. सभापती :-**

काहीच नमुद केलेले नाही.

**शशिकांत भोईर :-**

मग त्यांना अचानक माहिती गेली.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांना अधिकार आहे ते कक्ष अधिकारी आहेत.

**मा. आयुक्त :-**

कक्ष अधिकाऱ्यांनी आपल्या शासनाचा आदेश कळवला. त्यांच्यावतीने कळवला.

**शशिकांत भोईर :-**

कोणी ऑब्जेक्शन घेतलेले आहे असे काही नाही.

**मा. आयुक्त :-**

तसा काही उल्लेख पण केलेला नाही. आपण काहीच गेसिंग करु शकत नाही.

**शशिकांत भोईर :-**

अहवाल सादर केल्यानंतर त्यांनी स्थगिती आदेश उठवला.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब, ऑक्ट्राय वाल्यांनी आर.फॉर्म बद्दल लिहिले का?

**रोहिदास पाटील :-**

ऑक्ट्राय वाल्यांना या या लोकांकडून रिलिफ मिळेल अशी काही दुरुस्ती केली आहे का? आपण ह्या दुरुस्ती केल्या अशी काही टिपणी सांगा ना.

**मा. सभापती :-**

मगाशी मी बोललो ना या बाबतीमध्ये मागच्या वर्षी सोन्या-चांदीचे शिष्टमंडळ आपल्याकडे आले. त्याच्यानंतर किराणा मालाचे शिष्टमंडळ आपल्याकडे आले. त्याच्यानंतर इंडस्ट्रीयल वाडी आपल्याकडे आले आणि त्या संदर्भामध्ये त्यांच्यासोबत जी चर्चा झाली. त्याबाबत आपण ही आला होता. मा. उपमहापौर ही आले होते.

**एस. ए. खान :-**

मध्यम वर्गाचे लोक आले नाही.

**मा. आयुक्त :-**

सगळे आले. जे जे वेरीएशन आपल्याकडे आले. त्या त्या संदर्भामध्ये एक तोडगा त्याठिकाणी काढला. आणि त्या तोडग्याप्रमाणे आतापर्यंत जवळ जवळ ५ ते ६ महिन्यापासून अशाप्रकारची एकही तक्रार महापालिकेकडे कोणाचीही प्राप्त झालेली नाही. याचा अर्थ आपण असे ग्राह्य धरले की, आता जे काही निकष ठरवलेले आहे. त्या निकषाप्रमाणे ते जकात घेत असतील किंवा संबंधित जकात भरणारे आहेत. ते जकात भरत असतील. त्यामुळे हा वाद राहिलेला नसून संपूष्टात आलेला आहे. तरीसुद्धा आता सन्मा. सदस्यांनी करारनाम्यामध्ये किंवा जो काही आपण ठेकेदाराशी करारनामा करणार आहोत त्याबद्दल आपण स्पष्ट त्या तरतुदी नमुद करु. जो काही सन्मा. सदस्यांनी दुसरा जो काही मुद्दा उपस्थित केला त्याबद्दल स्पष्ट तरतुदी नमुद करु जी काही दंडाच्या रकमेच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला होता त्याची सुद्धा आपण करारनाम्यामध्ये स्पष्टपणे उल्लेख करु.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण महानगरपालिकेमार्फत भरारी पथक नेमू.

**जयंत पाटील :-**

आर. फॉर्म बाबत मी विचारले होते जे काही जकातीचे प्रारुप नियम आहेत त्याच्यामध्ये रिटर्न फार्मसंबंधी आहेत मग त्याने ते का बंद केले. आता ह्यांचा जो विषय डॉक्टर जे काही सामान आणतात ते अन्य कोणतेही सामान आणू शकतात.

**मा. आयुक्त :-**

मा. आमदारसाहेबांना जे असोसिएशनचे पत्र आणले आहे या संदर्भात जर समजा माझ्यापर्यंत अशी जर एखादी तक्रार आली असतो किंवा आपण सन्मा. सदस्यांनी एखाद्याने सांगितले असते तरी त्याला आपण ताबडतोब इंप्स्ट्रक्शन दिले असते.

**जयंत पाटील :-**

महापालिकेची जी जकात संबंधाची नोंद आहे. ते नियम त्यांनी फॉलो अप केले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

फॉलो अप करायलाच पाहिजे.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, त्याच्यामध्ये दुसरी सुचना अशी आहे की, सामान्य माणसं जी गावावरुन येतात. त्या सामान्य माणसांची बॅग, पिशवी वगैरे चेक करतात. ते सुद्धा बरोबर दिसत नाही.

**मा. सभापती :-**

उसमे आपने लोग भी फसाए जाते है। सब बाजू से देखना है।

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये सोन्या चांदी आणि हिऱ्याच्या बाबतीमध्ये पैलू पाडायला या ठिकाणी येतात. त्या संदर्भात संघटनांबद्दल आपली चर्चा झाली ना त्याच्यानंतर आतापर्यंत एकही तक्रार प्राप्त झाली नाही.

**एस. ए. खान :-**

चेक करायचे असेल तर करा. पण, व्यवस्थित तरी बोला ना. एकदम सगळं सामान बाहेर काढतो. ऐकून देतो. असे करायला नाही पाहिजे. व्यवस्थित बोलायला पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

ती गाडी जी असते. ती गाडी पुष्कळ वेळ पार्कींग करते. म्हणजे तिला बघायचे नाही. गाडी लावून ठेवतात. ती गाडी भड्याची असते. भाड्याचा ड्रायव्हर असतो. तुमचे काय आहे ते मिटवा. माझ्या गाडीचे भाडे चढते. कारण, आणणारा माणूस भाडे जास्त देत नाही. मग, ड्रायव्हर आणि मालक दुसरे भांडण चालू असते की, आम्हाला वेटींग चार्ज द्या.

**मा. आयुक्त :-**

याबाबतीमध्ये जनतेला त्रास व्हायला नको आणि अशाप्रकारे जर जनतेला त्रास होत असेल तर त्याच्या बाबतीमध्ये त्यांना इन्स्ट्रक्शन देवू.

**एस. ए. खान :-**

साहेब, आणि सेटींग असते. पहिली गाडी पुढे जावून देतात आणि पुढे जावून पकडतात. आणि पुढे जावून सांगणार की, १० टक्के द्या. त्यांना माहित असते.

**(सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. ६३ च्या ठरावाचे वाचन केले.)**

**शशिकांत भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. ६३ :-**

महानगरपालिकेत सुरक्षा रक्षक नेमणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र. ५७ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००७-०८ सालाकरीता जकात वसुलीसाठी जकात वसुली अभिकर्ता नियुक्त करणेकामी मा. स्थायी समिती सभा दि. ११/०५/२००७ मधील ठराव क्र. १८ अन्वये सर्वानुमते मंजुरी देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे महानगरपालिकेने जास्तीची स्पर्धा निर्माण होवून किफायदेशीर निविदा महानगरपालिकेस प्राप्त व्हावी व महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ व्हावी ह्याकरीता १) दै. नवभारत (हिंदी) २) द. इंडियन एक्सप्रेस (इंग्रजी) ३) दै. सामना (मराठी) ४) दै. सकाळ (मराठी) आणि ५) सुरज प्रकाश (स्थानिक हिंदी) ह्या वृत्तपत्रांमध्ये दि. १८/०५/२००७ रोजी जाहिरात प्रसिध्द केलेली होती. एकूण सहा निविदा फॉर्म विक्रीला गेलेले होते व त्यापैकी खालीलप्रमाणे तीन निविदा सादर केलेल्या होत्या.**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | पत्ता |
|---|---|---|
| १ | मे. आयडीयल रोड बिल्डर्स प्रा.लि. | आय.आर.बी. कॉम्प. चांदवली व्हिलेज, अंधेरी (पूर्व) |
| २ | मे. कोणार्क इन्फ्रा. प्रा.लि. | तळमजला, सपना टॉकिज, सपना गार्डन, उल्हासनगर |

| | | |
|---|---|---|
| ३ | मे. सहकार एजन्सी प्रा.लि. | ८/८ दयाभाई कंपा., पेट्रोल पंप समोर, एस. व्ही. रोड, मालाड (पश्चिम) |

**मुदतीमध्ये प्राप्त झालेल्या निविदा दि. ३१/०५/२००७ रोजी सायं. ५.०० वाजता मा. आयुक्त सो. यांच्या दालनात जकात निवड समिती व उपस्थित निविदाधारक ह्यांच्या समक्ष उघडण्यात येणार होत्या. परंतु मा. नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.मुंम/मि.भा.मनपा/११०७/८४८/प्र.क्र./१९७/नवी२८, दि. ३१/०५/२००७ रोजी ठिक ४.४० वाजता आलेल्या फॅक्स संदेशावरुन सदरच्या निविदा प्रक्रियेस स्थगिती देण्यात आलेली होती. त्यामुळे सदर निविदा शासनाच्या आदेशाप्रमाणे न उघडता तशाच सिलबंद निविदा पेटीमध्ये मा. आयुक्त सो यांच्या दालनात ठेवण्यात आल्या होत्या.**

**तद्नंतर मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग पत्र क्र.मुंम/मि.भा.मनपा /११०७/८४८/प्र.क्र./१९७/ नवी२८, दि. ०८/०६/२००७ च्या फॅक्स संदेशानुसार स्थगिती उठविण्यात आलेली आहे. जा.क्र. मनपा/जकात/१२५/०७-०८, दि. ०८/०६/२००७ अन्वये प्राप्त निविदा दि. ११/०६/२००७ रोजी ठिक १०.३० वाजता मा. आयुक्त यांच्या दालनात उघडण्यात येणार असल्याबाबत व सदर कार्यवाहीस उपस्थित राहण्याबाबत ठेकेदार व निविदा समिती सदस्य यांना लेखी कळविण्यात आले होते.**

**तसेच महाराष्ट्र शासन नगरविकास यांचे दि. ०८/०६/२००७ चे समक्रमांकाचे फॅक्स पत्र दि. ११/०६/२००७ रोजी सकाळी ठिक ११.३२ वाजता प्राप्त होवून सदर पत्राचे वाचन उपस्थितांसमोर करण्यात आले. व दि. ११/०६/२००७ रोजी ठिक ११.५५ वाजता मा. आयुक्त सो. ह्यांच्या दालनामध्ये जकात निवड समिती व उपस्थित निविदाधारकांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीमध्ये जकात निविदा उघडण्यात आल्या. त्यामध्ये खालील प्रमाणे देकार रक्कमा निविदाधारकांनी निविदेत नमुद केल्या आहेत.**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | पत्ता |
|---|---|---|
| १ | मे. आयडीयल रोड बिल्डर्स प्रा.लि. | रु. ७३,११,००,०००/- |
| २ | मे. कोणार्क इन्फ्रा. प्रा.लि. | रु. ७३,३१,४०,०००/- |
| ३ | मे. सहकार एजन्सी प्रा.लि. | रु. ७३,१७,००,०००/- |

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची सन २००७-०८ सालाची जकात वसुली किमान देकार रक्कम रुपये ७३,०९,८६,३००/- निश्चित केलेली आहे. वरील उघडलेल्या निविदांची तुलनात्मकरित्या पहाणी केली असता मे. कोणार्क इन्फ्रा. प्रा.लि. यांची देकार निविदा सर्वात जास्त रक्कमेची रु. ७३,३१,४०,०००/- (अक्षरी रुपये :- त्र्याहत्तर कोटी एकतीस लाख चाळीस हजार मात्र) आहे. सदरची निविदा किमान देकार रक्कमेच्या रु. २१,५३,७००/- नी जास्तीची आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८, कलम ३५ अन्वये सन २००७/२००८ या आर्थिक वर्षासाठी मे. कोणार्क इन्फ्रा. प्रा.लि. यांनी निविदा स्विकारुन "जकात वसुली अभिकर्ता " म्हणून नेमणूक करणेकामी मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे. महानगरपालिकेने भरारी पथक नेमावे.**

(सन्मा. सदस्य -------------------- यांनी ठराव क्र.६४ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

जयंत पाटील :-

महापालिकेचा कारभार मराठीत चालू असताना तुम्ही इंग्लीश मध्ये का दिलेले आहे? आम्हाला ते वाचून दाखवा.

दिपक खांबित :-

दरामध्ये नेहमी वाढ होत असते. त्याप्रमाणे जी.आर. मध्ये तरतुद आहे की, इस्कालेशनची जी भाववाढ होईल .........

ध्रुवकिशोर पाटील :-

साहेब, हा धोरणात्मक निर्णय आहे. हा विषय मा. महासभेमध्ये जावू दे आणि इस्कालेशन द्यायची गरज नाही. कारण १ करोड रुपये आपल्या पालिकेला लॉस होतो आणि ऑलरेडी नगरसेवकाची कामं पेन्डींग आहे. फंड नसल्यामुळे ती काम निघत नाही.

रोहिदास पाटील :-

१ कोटी रुपयेचा विषय तुम्ही ..........

जयंत पाटील :-

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) हा विषय धोरणात्मक आहे. हा विषय स्थायी समितीचा नाही.

**रोहिदास पाटील :-**

हो धोरणात्मक विषय आहे. एवढं सगळे केस समजता.

**दिपक खांबित :-**

कायद्यात तरतुद आहे.

**रोहिदास पाटील :-**

कायद्यात तरतुद आहे. ते शेवटच्या मिटिंगमध्ये येणे योग्य आहे. तरतुद कायद्यासाठी निघाल्या. हा जी.आर. कोणत्या तारखेला आहे.

**दिपक खांबित :-**

१६/०५/२००५ ला निघाले.

**रोहिदास पाटील :-**

१६/५/२००५ ला निघाले तर आज तारिख किती आहे. ज्या वेळी ज्या ठेकेदारानी जी मागणी केली होती. तर त्या ठेकेदाराने ती मागणी वाचलेली का? ती मागणी सभेपुढे आहे. मग ती स्थायी समिती की मा. महासभेपुढे तुम्ही असे किती प्रकरण आणलेले होते.

**दिपक खांबित :-**

प्रशासनाकडे तपासायला आलेले होते. जोपर्यंत -- होत नाही तिकडे प्रशासनाने आणलेले आहे ना.

**रोहिदास पाटील :-**

याच्यावर प्रशासन अधिकाऱ्यांनी ही जी १ कोटी रु. ची कामे काढली. ती कामे कोणत्या तारखेपासून काढली. २००५ पासून जर आपण वाढ द्यायला आपली संमती आहे. तर ते त्या तारखेपासून काढलेली आहे की, गेल्या महिन्यात काढलेली आहे की, जे ब्लॅक लिस्ट मध्ये टाकलेले आहे. हे ठेकेदाराची कामे आहे की, कामाची नावे आहेत म्हणजे अमुक काम केले ते कामाला द्यायचे आहे की अमुक ठेकेदारानी मागणी केले म्हणून द्यायचे आहे.

**दिपक खांबित :-**

दि. १६/०५/०५ पासून यांनी कामे केले. आणि जी कामे २५ लाख रु. पेक्षावरती आहे त्याचे आपण स्ट्रक्चर काढलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांनाच का? ५ लाख रु. ची, १० लाख रु. ची कामे केली तुम्ही त्यांना का दिले नाही. २५ लाख रु. वरती तुम्ही हे केलेले का आहे?

**दिपक खांबित :-**

साहेब टेंडरमध्ये अशी कंडीशनच आहे ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हे चुकीचे आहे.

**जयंत पाटील :-**

त्यांनी निविदा ज्या भरल्या.....

**रोहिदास पाटील :-**

त्यांनी काम केले. आणि त्यांना वाढीव दिली.

**जयंत पाटील :-**

त्यांनी निविदा ज्या भरल्या. त्या परवडल्या म्हणून त्या रेटमध्ये भरल्या. आता बाजारभाव काय चालू आहे? डिझेलचे भाव किती आहे? पेट्रोलचे भाव किती?

**रोहिदास पाटील :-**

म्हणजे त्यांचे ॲप्लीकेशन आणि त्याचे एक्झीबिशन पुढे हे दोन्ही तर त्याच्यात टर्म कंन्डीशन असते ना.

**जयंत पाटील :-**

त्यांनी पैसे देवून मोकळे झाले असतील. २००५ पासून दिले गेले नाही.

**दिपक खांबित :-**

दिले. पण इस्केलेशन चे बिल दिली नाही. साहेब, तुम्ही निर्णय घ्या.

(सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. ६४ च्या ठरावाचे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

अधिकारी आहे ते आपल्या स्टॅण्डींग चे आहे.

**दिपक खांबित :-**

निविदा मंजूरीचे सर्व अधिकारी आहे. स्टॅण्डींग कमिटीचे पण आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, २५ लाख रु. ला आपण मंजूरी देतो. तर ५ लाख रु. आहे. १० लाख रु. आहे. त्यांना सुद्धा तेच नियम लागू असतात ना.

**दिपक खांबित :-**

साहेब, छोटया कामाची मुदत १ महिना असते आणि मोठया कामाची मुदत कशी असते की सहा महिने, वर्षभर अशी असते. त्यामुळे मोठी कामे घेतात.

**मा. सभापती :-**

ठराव स्थंगित राहू द्या. पुढचा विषय घ्या.

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. ६५ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्या जेन्वी अल्मेडा यांनी प्रकरण क्र. ६५ च्या ठरावाचे वाचन केले.)

**परशुराम म्हात्रे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

प्रकरण क्र. :- ६५

ठराव क्र. :-

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. ६६ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. ६६ च्या ठरावाचे वाचन केले.)

परशुराम म्हात्रे :-

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

प्रकरण क्र. :-६६

ठराव क्र. :-

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. ६७ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

निविदा मंजूरीमध्ये दोन निविदा आहे. ६७ आणि ६७ अ असे दोन गोषवारे आहे.

(सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी प्रकरण क्र. ६७ च्या ठरावाचे वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**रतन पाटील :-**

प्रकरण क्र. ६७ काय आहे?

**दिपक खांबित :-**

प्रकरण क्र. ६७ बांधकाम विभागोच आहे आणि ६७(अ) जो आहे तो आरक्षण विभागाचा आहे. ते दोन्ही ठराव आता मांडले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ६७(अ) मध्ये मनीबल चॅरीटी ट्रस्ट आहे. ते ३ लाख ३३ हजार रु. आहे. आणि मेमर्स अमरदिप शिक्षण संस्था ३लाख रु. आहे. तर अमरदिप शिक्षण संस्था ३ लाख रु. आहे. तर अमरदिप शिक्षण संस्था ही भाईंदरची आहे आणि ऑलरेडी रनिंग स्कूल आहे. आणि ती चॅरीटेबल स्कूल नाही. तर आपण अमरदिप शिक्षण संस्था बोलावा. आणि ती ३ लाख ३३ हजार रु. ची जी फिगर आहे. ती या संस्थेला देवूया.

**मा. सभापती :-**

स्वयंशिल आहे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हो. सगळे रेडी आहे. ऑलरेडी ते रनिंग आहे.

**दिलीप घेवारे :-**

२५ लाख रु. चे ऑलरेडी दिलेली आहे.

**मा. सभापती :-**

२५ लाख रु. चे स्वयंशील नाही.

**रोहिदास पाटील :-**

ॲक्वेस्ट करुन घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

घेवारे साहेब, कसे आहे की, तुमचे म्हणणे बरोबर आहे. पण, ती शाळा आपल्या भाईंदरमध्ये ऑलरेडी रनिंग आहे. मराठी मिडीयमची शाळा आहे. आणि हे जे मनिबल चॅरीटीबल ट्रस्ट आहे ना. त्यांच्याकडे शाळासुध्दा नाही. आणि ही मुंबईची ट्रस्ट आहे. आणि आपल्याला स्थानिकांना प्राधान्य दिले पाहिजे.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, आमच्या मिरारोडला जो उड्डाणपुल आहे. तिथे रेल्वे समांतर रस्ता बनवायचा आहे. तर ते उड्डाणपुल पासून साई पार्क पर्यंत ३०० मीटर डी.पी. रोड होता आणि प्लेझेंट पार्क इथे छत्रपती शिवाजी महाराज मार्ग येथे ३०० मीटरचा डी.पी. रोड आहे. ते दोन्ही काम मंजुर झालेले आहे. पण, जे काम ठेकेदाराला दिलेले आहे ते अजुनपर्यंत पूर्ण केलेले नाही. तर माझी अशी सुचना आहे की, पहिला जो ठेकेदार आहे. त्यांच्याकडून काम काढून दुसरे ठेकेदार आहे, त्यांचे टेंडर भरलेले आहे. तर ते दुसऱ्या ठेकेदारांना देण्यांत यावे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर. पुढचा विषय घेण्यांत यावा.

(सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी प्रकरण क्र. ६७ 'अ' च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**परशुराम म्हात्रे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

३ लाख ३३ हजार रुपये त्यांचे आहे. तेवढी रक्कम भरुन किंवा त्याच्यापेक्षा जास्त रक्कम महापालिकेकडून भरु.

**जयंत पाटील :-**

माझा ठरावला विरोध नाही. पण मला अशी माहिती द्या की, दि. २६/०४/२००७ रोजी जी बैठक झाली. तर, त्याची नियमावली तुम्ही बनवलेली आहे. तर ती नियमावली काय आहे? ते आम्हाला कळू द्या. तुम्ही कुठल्या तऱ्हेने डेव्हलपला दिले? तर त्याची नियमावली काय आहे? नियमावली काय आहे ते मला माहित नाही.

**दिलीप घेवारे :-**

त्या मिटींगमध्ये असे ठरले होते की, सदर कामाचा कालावधी हा प्राथमिक शाळेचे खेळाचे मैदान पूर्ण करण्यासाठी दोन वर्ष ठेवावे आणि बगीचा आणि क्रिडांगण यासाठी उक वर्ष ठेवावा. विकासकाने सदर काम पूर्ण झाल्यापासून ३० वर्षाचा कालावधी द्यावा. सदर कामी बँक गॅरेंटी दोन लाख रुपये स्वरुपात प्रत्येक आरक्षणासाठी स्वतंत्ररित्या मंजुरीसाठी घ्यावी. ५० हजार रु. चा डिमांड ड्राफ्ट प्रत्येक आरक्षणासाठी स्वतंत्ररित्या निविदे सोबतच घ्यावा. प्रकल्पाचे नकाशे, अंगवा, पत्रक विकासकामे तयार करणे असून त्यास महानगरपालिकेची पूर्ण मंजुरी घेवून त्यानुसार काम करावे. कामास काही किरकोळ बदल विकासकाम करायचे असल्यास त्यास पूर्ण मंजुरी घेणे आवश्यक राहील. विकासकामे केलेल्या प्रत्येक कामाची वेगवेगळी मोजणी होवून होल असलेल्या खर्चाची पडताळणी करण्यांत येणार असून त्यासाठी विकासकामे करणे तांत्रिक कर्मचाऱ्यामार्फत बिल तयार कारुन मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे सादर करावयाचे आहे व त्यानुसार मिरा भाईंदर महापालिकेच्या मार्फत होत असलेल्या कामाची किंमत ऐकून नक्की केली जाईल. मागील तीन वर्षाचा आयकर व विक्रीकर भरणा केल्याबाबतचा दाखला निविदेसोबत सादर करावयाचा आहे. शाळेसाठी राष्ट्रीयकृत बँकेची २५ लाख रु. रक्कमेची बँक सोलिशन सर्टीफिकेट निविदेसोबत सादर करायची आहे. अशाप्रकारचे अन्य प्रकल्पाचे काम पूर्ण केलेले असल्यास दाखल्या सोबत सादर करण्यास प्राधान्य देण्यात येईल. शाळा विकसित करण्याच्या प्रस्ताव कामे जागेच्या आजच्या शिघ्रधनक नुसार कमीत कमी तीन टक्के भाडे प्रती वर्षी याप्रमाणे आकारण्यात येणार आहे. प्रस्तावित शाळा इमारतीचे बांधकाम हे विकास नियंत्रण नियमानुसार करावयाचे आहे व त्यास वेळोवेळी सर्व महानगरपालिकेची मंजुरी घेण्याची आवश्यकता विकासकाची राहील. तसेच बगीचा विकसित करण्या संबंधित सहकारी संस्था पुढे येत असतील तर त्यांना प्राधान्य देण्यात येईल. पण, बगीचेच्या टेंडरला आपले एकही टेंडर प्रतिनिधी मिळालेली नाही. खेळाच्या मैदानाला वर्षातुन ३० दिवस विकासकास स्वतःसाठी वापरण्यास परवानगी असून त्यास महानगरपालिकेच्या प्रभाग कार्यालयाकडून पूर्ण परवानगी घेणे आवश्यक आहे.

**जयंत पाटील :-**

खेळाच्या मैदानाबद्दल बोलायचे आहे. खेळाच्या मैदानामध्ये इतर ज्या संस्था किंवा इतर खाजगी मुले, असतील तर त्यांना तो दर लागणार आहे का?

**दिलीप घेवारे :-**

दर लागणार नाही.

**जयंत पाटील :-**

ंत्याचात तशी नोंद करुन घ्या. कुठल्याही वेळेला दर नको. त्याला फक्त ३० दिवस मिळणार.

**दिलीप घेवारे :-**

बाकीचे दिवस जे आहे ते आपली लोक जी रहिवाशी आहे .........

**जयंत पाटील :-**

या योजना लोकांसाठी आहेत. जनतेसाठी आहे आणि त्याचा फायदा जनतेला झाला पाहिजे तो आज डेव्हलप करणार तर त्याचे नक्की काय आहे? तो त्याच्यानंतर काय कमवणार? त्याचा उद्देश काय?

**दिलीप घेवारे :-**

त्याच्यामध्ये १५ टक्के जागेमध्ये आहे. त्याच्यात क्लब हाउस, स्विमिंग पुल, रेस्टॉरेन्ट असा काही अहवाल आपण जे करु. त्याच्यातुन त्याची वार्षिक कमाई होवून त्याचा मेन्टेनन्स होईल आणि आपले वार्षिक भाडे भरायला पात्र होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांनी त्यांना संध्याकाळी लग्नामध्ये दिले.

**दिलीप घेवारे :-**

लग्न किंवा गणपती आहे किंवा राजकिय पक्षाच्या काही सभा आहे. तेव्हा त्याला तो

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १२.४५ वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**